RNI No. MAHBIL/2012/47976
www.dgps.maharashtra.gov.in



# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग एक – पुणे विभागीय पुरवणी

वर्ष-१५, अंक-६ ] शुक्रवार, ऑगस्ट २८, २०२६ / भाद्र ६, शके १९४८ [ पृष्ठे १५

## असाधारण क्रमांक ०६

## प्राधिकृत प्रकाशन

### जिल्हाधिकारी यांजकडून

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२६ पोट-कलम (४) सह भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम १९ अन्वये*

**(नमुना १-अ)**

**अधिसूचना**

क्रमांक पीएलए/कावि/१०३९/२०२६.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७) (यात यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधिले आहे) चे कलम ३१ *(१)* अन्वये, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे बोऱ्हाडेवाडी गावाची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८०५/१०५०/प्र.क्र.७९५/०५/नवि-१३, दिनांक ३० मे २००८ व महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८०८/८९४/प्र.क्र.१७२७/०९/नवि-१३, दिनांक १८ ऑगस्ट २००९ व महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८१२/१६०/प्र.क्र.५८/१२ पुनर्बांधणी नंबर २७/१२ ई.पी. मंजुरी/नवि-१३, दिनांक २ मार्च २०१५ अन्वये मंजूर आहे (यात यापुढे "उक्त विकास योजना" आणि "उक्त अधिसूचना" असे संबोधिले आहे), तसेच पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील काही क्षेत्र महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग अधिसूचना क्रमांक पीसीएन-१६९७/९३४/प्र.क्र.८९/नवि-२२, दिनांक १५ नोव्हेंबर १९९७ अन्वये पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रणाखाली आले आहे तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ३७ अन्वये महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८२६/२४३/प्र.क्र.१५०/२०२६/नवि-१३, दिनांक १७ ऑगस्ट २०२६ अन्वये पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे भोसरी, मौजे मोशी व मौजे बोऱ्हाडेवाडी येथील मंजूर विकास योजनेतील ६१ मी., ४५ मी. व ६० मी. रुंदीच्या रस्त्यांबाबत प्रवेश आणि बाहेर (Entry and Exit) करिता रस्ता रुंदीकरणाचे अनुषंगाने फेरबदल मंजूर आहे;

आणि ज्याअर्थी, सोबतच्या अनुसुची-एक मध्ये नमूद केलेल्या जमिनी (यात यापुढे "उक्त जमिनी" म्हणून संबोधलेल्या) उक्त विकास योजनेत नाशिक फाटा ते इंद्रायणी नदीपर्यंत या रस्त्याच्या ६०.०० मी. रुंदीच्या रस्त्याबाबत प्रवेश आणि बाहेर (Entry and Exit) करिता रस्ता रुंदीकरण या आरक्षणाच्या प्रस्तावाने बाधित होत आहेत (यात यापुढे "उक्त सार्वजनिक प्रयोजन" म्हणून संबोधलेले);

आणि ज्याअर्थी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने नियोजन प्राधिकरण म्हणून (यात यापुढे "उक्त महानगरपालिका" म्हणून संबोधिलेली) उक्त नगररचना अधिनियमाचे कलम १२६, पोट-कलम *(१)* अन्वये उक्त जमिनी उक्त विकास योजना प्रस्ताव या सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादन करण्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे दिनांक १७ सप्टेंबर २०२५ रोजी पत्र क्र. F/PCMC/Town Planning/२५-२६/००००४१००७ अन्वये प्रस्ताव सादर केलेला आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभाग व सार्वजनिक आरोग्य विभागाने उक्त नगररचना अधिनियमाच्या कलम १५१ पोट-कलम *(१)* खाली काढलेली अधिसूचना क्रमांक टीपीएस-२१७५/५१०६/युडी-७, दिनांक ३ मार्च १९७९ अन्वये मंजूर विकास योजनेत सार्वजनिक प्रयोजनासाठी विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या जमिनीच्या संपादनाबाबतच्या उक्त नगररचना अधिनियमाच्या कलम १२६, पोट-कलम *(१)*, *(२)* व *(४)* खालील राज्य शासनाने वापरावयाच्या शक्ती त्या त्या जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आलेल्या आहेत;

आणि ज्याअर्थी, उक्त नगररचना अधिनियमाच्या कलम १२५ मध्ये सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम ५ *(१)* अन्वये दाखल मजकूर व ५ *(२)* अन्वये दाखल परंतुकानुसार उक्त नगररचना अधिनियम, अंतर्गत विकास योजनेतील आरक्षित जमिनीचे संपादन करताना भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (यात यापुढे "उक्त भूसंपादन अधिनियम" म्हणून संबोधलेला) मधील कलम ४ ते १५ (दोन्हीसह) यामध्ये विनिर्दिष्ट केलेली कार्यपद्धती, अशा जमिनींचे संबंधात लागू होणार नाहीत, तसेच शासनाच्या नगर विकास विभागाकडील पत्र क्रमांक टीपीएस-१८१९/१७९६/प्र.क्र.२९८/१८/नवि-१३, दिनांक ८ मार्च २०१९ अन्वये, "उक्त नगररचना अधिनियमांतर्गत विकास योजनेतील आरक्षित जमिनीचे संपादन करताना नवीन भूसंपादन अधिनियम, २०१३ मधील कलम ११ *(१)*, १६ ते १८ व यासोबतचे परिशिष्ट २ व ३ तसेच या अनुषंगिक कलमे लागू होणार नाहीत." अशा मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत;

आणि ज्याअर्थी, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनींची अनुसूची-दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या व उक्त विकास योजनेतील ६०.०० मी. रुंदीच्या रस्त्याबाबत प्रवेश आणि बाहेर (Entry and Exit) करिता रस्ता रुंदीकरणासाठी आरक्षित केलेल्या जमिनींची, सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे, अशी उक्त जमिनी उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक असल्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांची खात्री झाली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनींच्या संपादनापोटी द्यावयाच्या नुकसानभरपाईची रक्कम संपूर्णपणे उक्त महानगरपालिकेने अदा करावयाची आहे;

ज्याअर्थी, उक्त भूसंपादन प्रकरणी, मंजूर विकास योजनेतील रस्त्याच्या जागेच्या आखणीबाबत व हद्दीबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची राहील;

आणि ज्याअर्थी, उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६, पोट-कलम *(२)* मध्ये विनिर्दिष्ट केलेली कालमर्यादा यापूर्वीच उलटून गेलेली आहे;

ज्याअर्थी, शासनाने प्रदत्त केलेल्या अधिकारांचा वापर करून आणि उक्त नगररचना अधिनियमाच्या कलम १२६ पोट-कलम *(४)* सह भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम १९ अन्वये जिल्हाधिकारी, पुणे याद्वारे असे घोषित करतात की, उक्त जमिनी उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहेत;

आणि ज्याअर्थी, उक्त भूसंपादन अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, पुणे उक्त भूसंपादन अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी भूमी संपादन विशेष अधिकारी, विशेष घटक क्रमांक १, पिंपरी, पुणे-१८ (यापुढे "भूसंपादन अधिकारी" म्हणून संबोधलेला) यांना आदेश क्रमांक पीएलसी/सीआर/९३/२०२५, दिनांक ८ ऑक्टोबर २०२५ अन्वये पदनिर्देशित केलेले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनी उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादन करण्याबाबतची कार्यवाही आवश्यक त्या सर्व व्यवस्था करून सुरू करावी व ताब्यात घ्यावी, असे निर्देश देण्यात येत आहेत;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनींचा नकाशा भूमी संपादन विशेष अधिकारी, विशेष घटक क्रमांक १, पिंपरी, पुणे-१८ यांच्या दुसरा मजला, मनपा मार्केट इमारत, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे १८ येथील कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळात पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

## अनुसूची-एक

### संपादित करावयाच्या जमिनींचे वर्णन

### मौजे बोऱ्हाडेवाडी, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील विकास योजनेतील प्रस्तावित ६०.०० मी. रुंदीच्या रस्त्याबाबत प्रवेश आणि बाहेर (Entry and Exit) करिता रस्ता रुंदीकरणासाठी भूसंपादन

| अ.क्र. | संपादनाखालील मिळकती गट क्र. (नवीन) | संयुक्त मोजणी विवरणपत्रानुसारचे कब्जेदारांची नावे | संयुक्त मोजणी विवरणपत्रानुसारचे क्षेत्र | टी.डी.आर./ एफ.एस.आय/ खाजगी वाटाघाटीद्वारे पिंपरी-चिंचवड मनपाने यापूर्वी परस्पर ताब्यात घेतलेले क्षेत्र | भूसंपादनाखालील क्षेत्र | चतु:सीमा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | चौ.मी. | चौ.मी. | चौ.मी. | |
| १ | २७२ पै. | सहादू नाना गायकवाड व इतर | १७५० | -- | १७५० | उत्तर-नदी<br>पूर्व-नाशिक रस्ता<br>दक्षिण-ग.नं.२८१<br>पश्चिम-उर्वरित ग.नं.२७२ |
| २ | २८१ पै. | अधिकार अभिलेखाप्रमाणे | ३८० | -- | ३८० | उत्तर-ग.नं.२८४<br>पूर्व-नाशिक रस्ता<br>दक्षिण-ग.नं.२८४<br>पश्चिम-उर्वरित ग.नं.२८१ |
| ३ | ४९६ पै. | प्राधिकरण | १०० | -- | १०० | उत्तर-ग.नं.४९५<br>पूर्व-नाशिक रस्ता<br>दक्षिण-ग.नं.४९७<br>पश्चिम-प्राधिकरण हद्द |
| ४ | ४९७ पै. | प्राधिकरण | ८९ | -- | ८९ | उत्तर-ग.नं.४९६<br>पूर्व-नाशिक रस्ता<br>दक्षिण-ग.नं.४९६<br>पश्चिम-प्राधिकरण हद्द |
| ५ | ४९८ पै. | प्राधिकरण | ३५ | -- | ३५ | उत्तर-ग.नं.४९७<br>पूर्व-नाशिक रस्ता<br>दक्षिण-ग.नं.४९८<br>पश्चिम-प्राधिकरण हद्द |

## अनुसूची-दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नाव :-** मौजे बोऱ्हाडेवाडी, जिल्हा पुणे येथील विकास योजनेतील ६०.०० मी. रुंदीच्या रस्त्याबाबत प्रवेश आणि बाहेर (Entry and Exit) करिता रस्ता रुंदीकरणासाठी भूसंपादन करणेबाबत.

**प्रकल्पाच्या कामाचे वर्णन :-** ६०.०० मी. रुंदीच्या रस्त्याबाबत प्रवेश आणि बाहेर (Entry and Exit) करिता रस्ता रुंदीकरण.

**समाजाला होणारा लाभ :-** सुलभ व जलद वाहतूक दळणवळण.

**प्रकल्पाखालील जागेची सद्य:स्थिती :-** जमिनींचे भूसंपादन करावयाचे असून, संपादनाखालील काही क्षेत्र खुले आहे. भूसंपादनाखालील जागेचा ताबा जमीन मालकाकडे आहे.

**अनुसूची-तीन**

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**

**जिल्हा पुणे, तालुका हवेली, मौजे कात्रज व कोंढवा बुद्रुक**

| अ.क्र. | सर्व्हे नंबर | अंदाजित क्षेत्र |
|---|---|---|
| १ | २ | ३ |

लागू नाही.

**अनुसूची-चार**

**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश**

लागू नाही.

**टीप :--** उक्त अनुसूचीत नमूद जमिनींचे नकाशे विशेष भूमी संपादन अधिकारी, विशेष घटक क्रमांक १, दुसरा मजला, मनपा मार्केट इमारत, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११ ०१८ यांचे कार्यालयात निरीक्षणास उपलब्ध आहेत.

**जितेंद्र डुडी,**
जिल्हाधिकारी, पुणे.

पुणे, २८ ऑगस्ट २०२६.

---

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२६ पोट-कलम (४) सह भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम १९ अन्वये जिल्हाधिकारी यांनी केलेली घोषणा.*

**(नमुना १-अ)**

**अधिसूचना**

क्रमांक पीएलबी-२/कावि/१०९१/सन २०२६.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७) (यात यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधिले आहे.) चे कलम ३१ *(१)* अन्वये पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील मौजे भोसरी गावाची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८९३/१२७६/प्र.क्र. १७४/९३/नवि-१३, दिनांक १८ सप्टेंबर १९९५ अन्वये, तसेच पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील मौजे भोसरी गावाची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८९३/१४१२/नवि-१३, दिनांक २८ नोव्हेंबर १९९५ अन्वये मंजूर आहे, तसेच पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील काही क्षेत्र महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग अधिसूचना क्रमांक पीसीएन-१६९७/९३४/प्र.क्र. ८९/नवि-२२, दिनांक १५ नोव्हेंबर १९९७ अन्वये पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रणाखाली आले आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये मौजे भोसरी, मौजे मोशी व मौजे बोहोडेवाडी येथील मंजूर विकास योजनेतील ६१.०० मी., ४५.०० मी. व ६०.०० मी. रुंदीच्या रस्त्यांबाबत प्रवेश आणि बाहेर (Entry and Exit) करिता रस्ता रुंदीकरणासाठी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये प्रस्तावित फेरबदलाकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ *(२)* अन्वये शासनाच्या नगर विकास विभागाने अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८२६/२४३/प्र.क्र.१५०/२०२६/नवि-१३, दिनांक १७ ऑगस्ट २०२६ अन्वये मंजुरी प्रदान केलेली आहे;

आणि ज्याअर्थी, सोबतच्या अनुसूची-एक मध्ये नमूद केलेल्या जमिनी (यात यापुढे "उक्त जमिनी" म्हणून संबोधिलेल्या) उक्त सोबतच्या अनुसूची-दोन मध्ये नमूद केलेल्या उक्त मंजूर विकास योजनेतील मौजे भोसरी, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील मंजूर विकास योजनेतील ६१.०० मी., ४५.०० मी. रुंदीच्या रस्त्यांबाबत प्रवेश आणि बाहेर (Entry and Exit) करिता रस्ता रुंदीकरण या सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षित आहेत (यापुढे "उक्त सार्वजनिक प्रयोजन" म्हणून संबोधिलेल्या);

आणि ज्याअर्थी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने (यात यापुढे "उक्त महानगरपालिका" म्हणून संबोधिलेली) उक्त महाराष्ट्र अधिनियम, १९६६ च्या कलम १२६, पोट-कलम *(१)* अन्वये उक्त जमिनी उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादन करण्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे, यांचेकडील जावक क्रमांक F/PCMC/Town Planning/२५-२६/००००४१०१३, दिनांक १८ सप्टेंबर २०२५ अन्वये अर्ज केलेला आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभागाने, उक्त महाराष्ट्र अधिनियम, १९६६ च्या कलम १५१, पोट-कलम *(१)* खाली काढलेली अधिसूचना क्रमांक टीपीएस-२१७५/५१०६/नवि-७, दिनांक ३ मार्च १९७९ अन्वये, उक्त मंजूर विकास योजनेतील सार्वजनिक प्रयोजनासाठी विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या जमिनीच्या संपादनाबाबतच्या उक्त महाराष्ट्र अधिनियम, १९६६ च्या कलम १२६, पोट-कलम *(१), (२)* व *(४)* खालील राज्य शासनाने वापरावयाच्या शक्ती त्या त्या जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आलेल्या आहेत;

आणि ज्याअर्थी, उक्त भूसंपादन प्रकरणी नगर भूमापन अधिकारी, पिंपरी-चिंचवड व भूसंपादन संस्था या नात्याने पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे प्रतिनिधी यांनी संयुक्तपणे मोजणी केली असून सादर केलेल्या संयुक्त मोजणी नकाशे व क्षेत्रविवरण तक्त्यांच्या अनुषंगाने पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने पत्र क्रमांक नरवि/कावि/०७/१३४/२०२६, दिनांक १९ ऑगस्ट २०२६ अन्वये "सदर भूसंपादन प्रकरणी उपलब्ध अभिलेख व प्रत्यक्ष जागेवर तपासणी केलेली असून संयुक्त मोजणी नकाशा व क्षेत्रपत्रके हे मंजूर विकास योजनेशी सुसंगत आहेत." असा अभिप्राय दिलेला आहे;

आणि ज्याअर्थी, संपादनाखालील क्षेत्र मंजूर विकास योजनेतील आरक्षणाच्या आखणीनुसार संपादित होत असल्याबाबत खातरजमा करण्याची जबाबदारी तसेच आरक्षणाच्या आखणी व संपादनांतर्गत जागेच्या हद्दीबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी भूसंपादन संस्था या नात्याने पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाचा, सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२ अन्वये उक्त महाराष्ट्र अधिनियम, १९६६ अंतर्गत विकास योजनेतील आरक्षित जमिनींचे संपादन करताना भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (यात यापुढे "उक्त भूसंपादन अधिनियम, २०१३" म्हणून संबोधलेला) मधील ४ ते १५ या कलमांना सूट देण्यात आली आहे व सदरचा अध्यादेश महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक ३१ डिसेंबर २०१५ रोजी प्रसिद्ध झालेला आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाचा शासन निर्णय क्रमांक टीपीएस-१८१९/१७९६/प्र.क्र. २९८/१८/नवि-१३, दिनांक ८ मार्च २०१९ अन्वये "उक्त महाराष्ट्र अधिनियम, १९६६" मधील तरतुदीनुसार सुरू करण्यात आलेल्या भूसंपादन प्रकरणांमध्ये उक्त महाराष्ट्र अधिनियम, १९६६ च्या कलम १२५ ते १२६ मधील तरतूद विचारात घेता "उक्त भूसंपादन अधिनियम, २०१३ चे कलम ११ *(१)*, कलम १६ ते १८ यासोबतच परिशिष्ट २ व ३ तसेच या अनुषंगिक कलमे लागू होणार नाहीत" अशा सूचना दिल्या आहेत आणि म्हणून यासोबतच्या अनुसूची-तीन मधील पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन व अनुसूची-चार मधील पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश निरंक आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनींच्या संपादनापोटी द्यावयाच्या उक्त भूसंपादन अधिनियमानुसारची नुकसान भरपाईची रक्कम व तद्नुषंगिक भूसंपादनाच्या खर्चाची रक्कम संपूर्णपणे उक्त महानगरपालिकेने अदा करावयाची आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६, पोट-कलम *(२)* मध्ये विनिर्दिष्टित केलेली कालमर्यादा उलटून गेलेली आहे;

आणि ज्याअर्थी, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनींची अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या "उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी" आवश्यक असल्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांची खात्री झाली आहे.

त्याअर्थी, राज्य शासनाने प्रदत्त केलेल्या शक्तीनुसार आणि महाराष्ट्र अधिनियम, १९६६ चे कलम १२६, पोट-कलम *(४)* सह उक्त भूसंपादन अधिनियम, २०१३ चे कलम १९ च्या पोट-कलम *(१)* च्या तरतुदींन्वये, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनींची अनुसूची-दोन मध्ये नमूद सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे;

आणि त्याअर्थी, उक्त भूसंपादन अधिनियम, २०१३ च्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, उक्त भूसंपादन अधिनियम, २०१३ अन्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी भूमी संपादन विशेष अधिकारी, विशेष घटक क्रमांक १, पिंपरी, पुणे-४११०१८ यांस पदनिर्देशित करीत आहेत;

## अनुसूची-एक

## संपादित करावयाच्या जमिनींचे वर्णन

## जिल्हा पुणे, तालुका हवेली, मौजे भोसरी

| अ. क्र. | सर्व्हे क्रमांक | नगर भूमापन क्रमांक | भूसंपादना खालील निव्वळ क्षेत्र (चौ. मी.) | | | कब्जेदारांची नावे | चतु:सीमा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ हेक्टर | ५ आर | ६ चौ.मी. | ७ | ८ | |
| १) | ५५३ चा (भाग) | -- | ० | ० | ६४ | अधिकार अभिलेखाप्रमाणे | पूर्व : | सी. एम. ई. हद्द |
| | | | | | | | पश्चिम : | नाशिक रस्ता |
| | | | | | | | दक्षिण : | स. नं. ५५४ |
| | | | | | | | उत्तर : | स. नं. ५५२ |
| २) | ५५४ चा (भाग) | -- | ० | २ | ५४ | अधिकार अभिलेखाप्रमाणे | पूर्व : | सी. एम. ई. हद्द |
| | | | | | | | पश्चिम : | नाशिक रस्ता |
| | | | | | | | दक्षिण : | स. नं. ५५३ |
| | | | | | | | उत्तर : | स. नं. ५५३ |
| ३) | ५५५ चा (भाग) | -- | ० | ६ | ८१ | अधिकार अभिलेखाप्रमाणे | पूर्व : | सी. एम. ई. हद्द |
| | | | | | | | पश्चिम : | नाशिक रस्ता |
| | | | | | | | दक्षिण : | स. नं. ५५६ |
| | | | | | | | उत्तर : | स. नं. ५५४ |
| ४) | ५५६ चा (भाग) | -- | ० | १ | ५ | अधिकार अभिलेखाप्रमाणे | पूर्व : | सी. एम. ई. हद्द |
| | | | | | | | पश्चिम : | नाशिक रस्ता |
| | | | | | | | दक्षिण : | स. नं. ५५७ |
| | | | | | | | उत्तर : | स. नं. ५५५ |
| ५) | ६८८ चा (भाग) | -- | ० | २ | ६८ | अधिकार अभिलेखाप्रमाणे | पूर्व : | स. नं. ६९१ |
| | | | | | | | पश्चिम : | उर्वरित स. नं. ६८८ पै. |
| | | | | | | | दक्षिण : | नाशिक रस्ता |
| | | | | | | | उत्तर : | उर्वरित स. नं. ६८८ पै. |

**अनुसूची-एक---*चालू***

| अ. क्र. | सर्व्हे क्रमांक | नगर भूमापन क्रमांक | भूसंपादना खालील निव्वळ क्षेत्र (चौ. मी.) | | | कब्जेदारांची नावे | चतु:सीमा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ हेक्टर | ५ आर | ६ चौ.मी. | ७ | ८ | |
| ६) | ६९१ चा (भाग) | ३३३८ चा (भाग) | ० | १ | ८६ | अधिकार अभिलेखाप्रमाणे | पूर्व : | स. नं. ६९० |
| | | | | | | | पश्चिम : | स. नं. ६८८ |
| | | | | | | | दक्षिण : | नाशिक रस्ता |
| | | | | | | | उत्तर : | स. नं. ६९१ |
| ७) | ६९१ चा (भाग) | ३३३९ चा (भाग) | ० | १ | ३५ | अधिकार अभिलेखाप्रमाणे | पूर्व : | स. नं. ६९० |
| | | | | | | | पश्चिम : | स. नं. ६८८ |
| | | | | | | | दक्षिण : | नाशिक रस्ता |
| | | | | | | | उत्तर : | स. नं. ६९१ |
| ८) | ६९० चा (भाग) | ३३५२ चा (भाग) | ० | ० | ३१ | अधिकार अभिलेखाप्रमाणे | पूर्व : | नाशिक रस्ता |
| | | | | | | | पश्चिम : | उर्वरित स. नं. ६९० पै. |
| | | | | | | | दक्षिण : | स. नं. ६९१ पै. |
| | | | | | | | उत्तर : | उर्वरित स. नं. ६९० पै. |
| ९) | ३०८ चा (भाग) | -- | ० | ८ | ३५ | अधिकार अभिलेखाप्रमाणे | पूर्व : | स. नं. ३०७ |
| | | | | | | | पश्चिम : | स. नं. ३१० |
| | | | | | | | दक्षिण : | सी. एम. ई. हद्द |
| | | | | | | | उत्तर : | नाशिक रस्ता |
| १०) | ३०७ चा (भाग) | -- | ० | ७ | २८ | अधिकार अभिलेखाप्रमाणे | पूर्व : | स. नं. ६८८ |
| | | | | | | | पश्चिम : | स. नं. ३०८ |
| | | | | | | | दक्षिण : | उर्वरित स. नं. ३०७ पै. |
| | | | | | | | उत्तर : | नाशिक रस्ता |

**अनुसूची-एक---***चालू*

| अ. क्र. | सर्व्हे क्रमांक | नगर भूमापन क्रमांक | भूसंपादना खालील निव्वळ क्षेत्र (चौ. मी.) | | | कब्जेदारांची नावे | चतु:सीमा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ हेक्टर | ५ आर | ६ चौ.मी. | ७ | ८ | |
| ११) | ३०९ चा (भाग) | -- | ० | ३ | ७१ | अधिकार अभिलेखाप्रमाणे | पूर्व : | स. नं. ३०८ |
| | | | | | | | पश्चिम : | स. नं. ३१० |
| | | | | | | | दक्षिण : | नाशिक रस्ता |
| | | | | | | | उत्तर : | उर्वरित स. नं. ३०९ पै. |
| १२) | ६८७ चा (भाग) | ३३३५ चा (भाग) | ० | ० | ३३ | अधिकार अभिलेखाप्रमाणे | पूर्व : | उर्वरित स. नं. ६८७ पै. |
| | | | | | | | पश्चिम : | टेल्को रोड |
| | | | | | | | दक्षिण : | नाशिक रस्ता |
| | | | | | | | उत्तर : | उर्वरित स. नं. ६८७ पै. |
| १३) | ११२ चा (भाग) | ४०९५ चा (भाग) | ० | ० | ९ | अधिकार अभिलेखाप्रमाणे | पूर्व : | नाशिक रस्ता |
| | | | | | | | पश्चिम : | उर्वरित स. नं. ११२ पै. |
| | | | | | | | दक्षिण : | स. नं. ९८ |
| | | | | | | | उत्तर : | उर्वरित स. नं. ११२ पै. |
| १४) | ११२ चा (भाग) | ४०९४ चा (भाग) | ० | ० | ३१ | अधिकार अभिलेखाप्रमाणे | पूर्व : | नाशिक रस्ता |
| | | | | | | | पश्चिम : | उर्वरित स. नं. ११२ पै. |
| | | | | | | | दक्षिण : | स. नं. ९८ |
| | | | | | | | उत्तर : | उर्वरित स. नं. ११२ पै. |
| १५) | ११२ चा (भाग) | ४०९३ चा (भाग) | ० | ० | ४६ | अधिकार अभिलेखाप्रमाणे | पूर्व : | नाशिक रस्ता |
| | | | | | | | पश्चिम : | उर्वरित स. नं. ११२ पै. |
| | | | | | | | दक्षिण : | स. नं. ९८ |
| | | | | | | | उत्तर : | उर्वरित स. नं. ११२ पै. |

**अनुसूची-एक---*चालू***

| अ. क्र. | सर्व्हे क्रमांक | नगर भूमापन क्रमांक | भूसंपादना खालील निव्वळ क्षेत्र (चौ. मी.) | | | कब्जेदारांची नावे | चतु:सीमा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ हेक्टर | ५ आर | ६ चौ.मी. | ७ | ८ | |
| १६) | ११२ चा (भाग) | ४०९२ चा (भाग) | ० | ० | ६४ | अधिकार अभिलेखाप्रमाणे | पूर्व : | नाशिक रस्ता |
| | | | | | | | पश्चिम : | उर्वरित स. नं. ११२ पै. |
| | | | | | | | दक्षिण : | स. नं. ९८ |
| | | | | | | | उत्तर : | उर्वरित स. नं. ११२ पै. |
| १७) | ९८ चा (भाग) | ३९५२ चा (भाग) | ० | १४ | ० | अधिकार अभिलेखाप्रमाणे | पूर्व : | नाशिक रस्ता |
| | | | | | | | पश्चिम : | उर्वरित स. नं. ९८ पै. |
| | | | | | | | दक्षिण : | स. नं. ९७ |
| | | | | | | | उत्तर : | स. नं. ११२ |
| १८) | ९७ चा (भाग) | ३९५१ चा (भाग) | ० | ६ | ८२ | अधिकार अभिलेखाप्रमाणे | पूर्व : | नाशिक रस्ता |
| | | | | | | | पश्चिम : | उर्वरित स. नं. ९७ पै. |
| | | | | | | | दक्षिण : | स. नं. ९६ |
| | | | | | | | उत्तर : | स. नं. ९८ |
| १९) | ९६ चा (भाग) | ३९५० चा (भाग) | ० | १ | ३१ | अधिकार अभिलेखाप्रमाणे | पूर्व : | नाशिक रस्ता |
| | | | | | | | पश्चिम : | उर्वरित स. नं. ९६ पै. |
| | | | | | | | दक्षिण : | उर्वरित स. नं. ९६ पै. |
| | | | | | | | उत्तर : | स. नं. ९७ |
| २०) | १२३ चा (भाग) | ४११२ चा (भाग) | ० | २० | ९३ | अधिकार अभिलेखाप्रमाणे | पूर्व : | उर्वरित स. नं. १२३ पै. |
| | | | | | | | पश्चिम : | नाशिक रस्ता |
| | | | | | | | दक्षिण : | उर्वरित स. नं. १२३ पै. |
| | | | | | | | उत्तर : | स. नं. ११९ |

**अनुसूची-एक---*चालू***

| अ. क्र. | सर्व्हे क्रमांक | नगर भूमापन क्रमांक | भूसंपादना खालील निव्वळ क्षेत्र (चौ. मी.) | | | कब्जेदारांची नावे | चतु:सीमा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ हेक्टर | ५ आर | ६ चौ.मी. | ७ | ८ | |
| २१) | ११९ चा (भाग) | ४११८ चा (भाग) | ० | २९ | १० | अधिकार अभिलेखाप्रमाणे | पूर्व : | उर्वरित स. नं. ११९ पै. |
| | | | | | | | पश्चिम : | नाशिक रस्ता |
| | | | | | | | दक्षिण : | स. नं. १२३ |
| | | | | | | | उत्तर : | स. नं. ११३ |
| २२) | ११३ चा (भाग) | ४१०८ चा (भाग) | ० | २ | ५० | अधिकार अभिलेखाप्रमाणे | पूर्व : | उर्वरित स. नं. ११३ पै. |
| | | | | | | | पश्चिम : | नाशिक रस्ता |
| | | | | | | | दक्षिण : | स. नं. ११९ |
| | | | | | | | उत्तर : | उर्वरित स. नं. ११३ पै. |
| २३) | ६०५ चा (भाग) | -- | ० | २ | १४ | अधिकार अभिलेखाप्रमाणे | पूर्व : | उर्वरित स. नं. ६०५ पै. |
| | | | | | | | पश्चिम : | स. नं. ६०६ पै. |
| | | | | | | | दक्षिण : | स. नं. ६०६ पै. |
| | | | | | | | उत्तर : | नाशिक रस्ता |
| २४) | ६०६ चा (भाग) | -- | ० | ८ | ३६ | अधिकार अभिलेखाप्रमाणे | पूर्व : | स. नं. ६०५ पै. |
| | | | | | | | पश्चिम : | स. नं. ६०८ पै. |
| | | | | | | | दक्षिण : | उर्वरित स. नं. ६०६ पै. |
| | | | | | | | उत्तर : | नाशिक रस्ता |
| २५) | ६०८ चा (भाग) | -- | ० | ५ | ९० | अधिकार अभिलेखाप्रमाणे | पूर्व : | स. नं. ६०६ पै. |
| | | | | | | | पश्चिम : | सी. एम. ई. हद्द |
| | | | | | | | दक्षिण : | उर्वरित स. नं. ६०८ पै. |
| | | | | | | | उत्तर : | नाशिक रस्ता |

**अनुसूची - दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव :** मौजे भोसरी, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील मंजूर विकास योजनेतील ६१.०० मीटर, ४५.०० मीटर रुंदीच्या रस्त्यांबाबत प्रवेश आणि बाहेर (Entry and Exit) करिता या सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादन.

**प्रकल्पाया कामाचे वर्णन :** ६१.०० मीटर, ४५.०० मीटर रस्ता रुंदीकरण

**समाजाला होणारा लाभ :** पायाभूत सुविधा, सोयी-सुविधा (आर्थिक, रोजगार, पायाभूत सुविधा, सोयी-सुविधा याबाबत व इतर लाभांसंबंधात).

**प्रकल्पाखालील जागेची सद्यस्थिती :** निरंक

**अनुसूची - तीन**

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**

**जिल्हा पुणे, तालुका हवेली, मौजे भोसरी**

| सर्व्हे नंबर / नगर भूमापन क्रमांक | अंदाजित क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|
| **पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन निरंक असे** | |

महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने जा. क्र. टीपीएस-१८१९/१७९६/प्र.क्र. २९८/१८/नवि-१३, दिनांक ८ मार्च २०१९ अन्वये “उक्त महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या अधिनियमामधील तरतुदीनुसार सुरू करण्यात आलेल्या भूसंपादन प्रकरणांमध्ये उक्त अधिनियमातील कलम १२५ ते १२६ मधील तरतूद विचारात घेता नवीन भूसंपादन कायद्यातील कलम ११ *(१),* कलम १६ ते १८ यासोबतच परिशिष्ट २ व ३ तसेच यानुषंगिक कलमे लागू होणार नाहीत.” अशा सूचना दिल्या आहेत.

**अनुसूची - चार**

**( पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश )**

**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश निरंक असे**

**टीप : -** उक्त अनुसूचीत नमूद जमिनींचे नकाशे भूमी संपादन विशेष अधिकारी, विशेष घटक क्रमांक १, पिंपरी, पुणे-४११०१८, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, संत तुकारामनगर, श्री शिवछत्रपती शिवाजी महाराज, गोल मंडई इमारत, दुसरा मजला, पिंपरी, पुणे-४११०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहण्याकरिता उपलब्ध आहेत.

**जितेंद्र डुडी,**
जिल्हाधिकारी, पुणे.

पुणे, २८ ऑगस्ट २०२६.

---

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२६ पोट-कलम (४) सह भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम १९ अन्वये जिल्हाधिकारी यांनी केलेली घोषणा.*

**(नमुना १-अ)**

**अधिसूचना**

क्रमांक पीएलबी-२/कावि/१०४०/सन २०२६.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७) (यापुढे “उक्त अधिनियम” असे संबोधिले आहे) चे कलम ३१ *(१)* अन्वये, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे मोशी गावाची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८०५/१०५०/प्र.क्र.७९५/०५/नवि-१३, दिनांक ३० मे २००८ व महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८०८/८९४/प्र.क्र.१७२७/०९/नवि-१३, दिनांक १८ ऑगस्ट २००९ व महाराष्ट्र शासन,

नगर विकास विभाग अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८१२/१६०/प्र.क्र. ५८/१२ पुनर्बांधणी नंबर २७/१२ ई. पी. मंजुरी/नवि-१३, दिनांक २ मार्च २०१५ अन्वये मंजूर आहे (यात यापुढे "उक्त विकास योजना" आणि "उक्त अधिसूचना" असे संबोधिले आहे) तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ३७ अन्वये महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८२६/२४३/प्र.क्र. १५०/२०२६/ नवि-१३, दिनांक १७ ऑगस्ट २०२६ अन्वये पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे भोसरी, मौजे मोशी व मौजे बोऱ्हाडेवाडी येथील मंजूर विकास योजनेतील ६१ मी., ४५ मी. व ६० मी. रुंदीच्या रस्त्यांबाबत प्रवेश आणि बाहेर (Entry and Exit) करिता रस्ता रुंदीकरणाचे अनुषंगाने फेरबदल मंजूर आहे ;

आणि ज्याअर्थी, सोबतच्या अनुसुची एक मध्ये नमूद केलेल्या जमिनी (यात यापुढे "उक्त जमिनी" म्हणून संबोधलेल्या) उक्त विकास योजनेत नाशिक फाटा ते इंद्रायणी नदीपर्यंत या रस्त्याच्या ६०.०० मी. रुंदीच्या रस्त्याबाबत प्रवेश आणि बाहेर (Entry and Exit) करिता रस्ता रुंदीकरण या आरक्षणाच्या प्रस्तावाने बाधीत होत आहेत (यापुढे "उक्त सार्वजनिक प्रयोजन" म्हणून संबोधलेले) ;

आणि ज्याअर्थी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने नियोजन प्राधिकरण म्हणून (यात यापुढे "उक्त महानगरपालिका" म्हणून संबोधिलेली) उक्त नगररचना अधिनियमाचे कलम १२६, पोट-कलम *(१)* अन्वये उक्त जमिनी उक्त विकास योजना प्रस्ताव या सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादन करण्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे दिनांक १७ सप्टेंबर २०२५ रोजी पत्र क्रमांक F/PCMC/Town Planning/२५-२६/००००४१०१७ अन्वये प्रस्ताव सादर केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभाग व सार्वजनिक आरोग्य विभागाने उक्त नगररचना अधिनियमाच्या कलम १५१ पोट-कलम *(१)* खाली काढलेली अधिसूचना क्रमांक टीपीएस-२१७५/५१०६/यूडी-७, दिनांक ३ मार्च १९७९ अन्वये मंजूर विकास योजनेत सार्वजनिक प्रयोजनासाठी विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या जमिनीच्या संपादनाबाबतच्या उक्त नगररचना अधिनियमाच्या कलम १२६, पोट-कलम *(१), (२)* व *(४)* खालील राज्य शासनाने वापरावयाच्या शक्ती त्या त्या जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आलेल्या आहेत ;

आणि ज्याअर्थी, उक्त नगररचना अधिनियमाच्या कलम १२५ मध्ये सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम ५ *(१)* अन्वये दाखल मजकूर व ५ *(२)* अन्वये दाखल परंतुकानुसार उक्त नगररचना अधिनियम, अंतर्गत विकास योजनेतील आरक्षित जमिनीचे संपादन करताना भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (यापुढे "उक्त भूसंपादन अधिनियम" म्हणून संबोधलेला) मधील कलम ४ ते १५ (दोन्हीसह) यामध्ये विनिर्दिष्ट केलेली कार्यपध्दती, अशा जमिनींचे संबंधात लागू होणार नाहीत, तसेच शासनाच्या नगर विकास विभागाकडील पत्र क्रमांक टीपीएस-१८१९/१७९६/प्र.क्र. २९८/१८/नवि-१३, दिनांक ८ मार्च २०१९ अन्वये "उक्त नगररचना अधिनियमांतर्गत विकास योजनेतील आरक्षित जमिनीचे संपादन करताना नवीन भूसंपादन अधिनियम, २०१३ मधील कलम ११ *(१)*, १६ ते १८ व यासोबतच परिशिष्ट २ व ३ तसेच या अनुषंगीक कलमे लागू होणार नाहीत" अशा मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत ;

आणि ज्याअर्थी, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमिनींची अनुसूची दोन मध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या व उक्त विकास योजनेतील ६०.०० मी. रुंदीच्या रस्त्याबाबत प्रवेश आणि बाहेर (Entry and Exit) करिता रस्ता रुंदीकरणासाठी आरक्षित केलेल्या जमिनीची, सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे, अशी उक्त जमीन उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक असल्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांची खात्री झाली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या संपादनापोटी द्यावयाच्या नुकसानभरपाईची रक्कम संपूर्णपणे उक्त महानगरपालिकेने अदा करावयाची आहे ;

ज्याअर्थी, उक्त भूसंपादन प्रकरणी, मंजूर विकास योजनेतील रस्त्याच्या जागेच्या आखणीबाबत व हद्दीबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची राहील ;

आणि ज्याअर्थी, उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६, पोट-कलम *(२)* मध्ये विनिर्दिष्ट केलेली कालमर्यादा यापुर्वीच उलटून गेलेली आहे ;

ज्याअर्थी, शासनाने प्रदत्त केलेल्या अधिकारांचा वापर करून आणि उक्त नगररचना अधिनियमांच्या कलम १२६ पोट-कलम *(४)* सह भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम १९ अन्वये जिल्हाधिकारी, पुणे याद्वारे असे घोषित करतात की, उक्त जमिनी उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहेत ;

आणि ज्याअर्थी, उक्त भूसंपादन अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, पुणे उक्त भूसंपादन अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी भूमी संपादन विशेष अधिकारी, विशेष घटक क्रमांक १, पिंपरी, पुणे-१८ (यात यापुढे "भूसंपादन अधिकारी" म्हणून संबोधलेला) यांना आदेश क्रमांक पीएलसी/सीआर/९८/२०२५, दिनांक ९ ऑक्टोबर २०२५ अन्वये पदनिर्देशित केलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमीन उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादन करण्याबाबतची कार्यवाही आवश्यक त्या सर्व व्यवस्था करून सुरू करावी व ताब्यात घ्यावी असे निर्देश देण्यात येत आहेत;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनींचा नकाशा भूमी संपादन विशेष अधिकारी, विशेष घटक क्रमांक १, पिंपरी, पुणे-१८ यांच्या दुसरा मजला, मनपा मार्केट इमारत, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे १८, येथील कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळात पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

**अनुसूची - एक**

**संपादित करावयाच्या जमिनींचे वर्णन**

**जिल्हा पुणे, तालुका हवेली, मौजे मोशी येथील विकास योजनेतील प्रस्तावित ६०.०० मी. रुंदीच्या रस्त्याबाबत प्रवेश आणि बाहेर (Entry and Exit) करिता रस्ता रुंदीकरणासाठी भूसंपादन**

| अ. क्र. | संपादना-खालील मिळकती गट क्र. (नवीन) | संयुक्त मोजणी विवरण-पत्रानुसारचे कब्जेदारांची नावे | संयुक्त मोजणी विवरण-पत्रानुसारचे क्षेत्र चौ. मी. | टी.डी.आर./ एफ.एस.आय. खाजगी वाटाघाटीद्वारे पिंपरी-चिंचवड मनपाने यापूर्वी परस्पर ताब्यात घेतलेले क्षेत्र | भूसंपादना-खालील क्षेत्र चौ. मी. | चतु:सीमा | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ चौ.मी. | ६ | ७ | |
| १) | ५० पै. | अधिकार अभिलेखाप्रमाणे | ५१२७ | -- | ५१२७ | उत्तर : | नदी |
| | | | | | | पूर्व : | उर्वरित ग. नं. ५० पै. |
| | | | | | | दक्षिण : | ग. नं. ४९ पै. |
| | | | | | | पश्चिम : | नाशिक रस्ता |
| २ | ४९ पै. | अधिकार अभिलेखाप्रमाणे | ३१०० | -- | ३१०० | उत्तर : | ग. नं. ५० पै. |
| | | | | | | पूर्व : | उर्वरित ग. नं. ४९ पै. |
| | | | | | | दक्षिण : | ग. नं. ४८ पै. |
| | | | | | | पश्चिम : | नाशिक रस्ता |
| ३ | ४८ पै. | अधिकार अभिलेखाप्रमाणे | ८३ | -- | ८३ | उत्तर : | ग. नं. ४९ पै. |
| | | | | | | पूर्व : | उर्वरित ग. नं. ४८ पै. |
| | | | | | | दक्षिण : | ग. नं. ४४ पै. |
| | | | | | | पश्चिम : | नाशिक रस्ता |
| ४ | ४७ पै. | काळुराम बाबुराव सस्ते व इतर | १४५ | -- | १४५ | उत्तर : | ग. नं. ४८ पै. |
| | | | | | | पूर्व : | उर्वरित ग. नं. ४७ पै. |
| | | | | | | दक्षिण : | ग. नं. ४४ पै. |
| | | | | | | पश्चिम : | ग. नं. ४४ पै. |

**अनुसूची-एक---*चालू***

| अ. क्र. | संपादना-खालील मिळकती गट क्र. (नवीन) | संयुक्त मोजणी विवरण-पत्रानुसारचे कब्जेदारांची नावे | संयुक्त मोजणी विवरण-पत्रानुसारचे क्षेत्र चौ. मी. | टी.डी.आर./ एफ.एस.आय. खाजगी वाटाघाटीव्दारे पिंपरी-चिंचवड मनपाने यापूर्वी परस्पर ताब्यात घेतलेले क्षेत्र | भूसंपादना-खालील क्षेत्र चौ. मी. | चतु:सीमा | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ चौ.मी. | ६ | ७ | |
| ५ | ४४ पै. | सुमन निवृत्ती सस्ते व इतर | ९५ | -- | ९५ | उत्तर : | ग. नं. ४८ पै. |
| | | | | | | पूर्व : | उर्वरित ग. नं. ४४ पै. |
| | | | | | | दक्षिण : | ग. नं. ४२ पै. |
| | | | | | | पश्चिम : | नाशिक रस्ता |
| ६ | ४२ पै. | अधिकार अभिलेखाप्रमाणे | ३२१ | -- | ३२१ | उत्तर : | ग. नं. ४४ पै. |
| | | | | | | पूर्व : | उर्वरित ग. नं. ४२ पै. |
| | | | | | | दक्षिण : | ग. नं. ४३ पै. |
| | | | | | | पश्चिम : | नाशिक रस्ता |
| ७ | ४३ पै. | मा. मानद सचिव, पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, पुणे | ४८ | -- | ४८ | उत्तर : | ग. नं. ४२ पै. |
| | | | | | | पूर्व : | उर्वरित ग. नं. ४३ पै. |
| | | | | | | दक्षिण : | उर्वरित ग. नं. ४३ पै. |
| | | | | | | पश्चिम : | नाशिक रस्ता |
| ८ | ४५२ पै. | अधिकार अभिलेखाप्रमाणे | ३१२६ | -- | ३१२६ | उत्तर : | उर्वरित ग. नं. ४५२ पै. |
| | | | | | | पूर्व : | उर्वरित ग. नं. ४५२ पै. |
| | | | | | | दक्षिण : | उर्वरित ग. नं. ४५२ पै. |
| | | | | | | पश्चिम : | नाशिक रस्ता |
| ९ | ४५१ पै. | अधिकार अभिलेखाप्रमाणे | २३० | -- | २३० | उत्तर : | उर्वरित ग. नं. ४५२ पै. |
| | | | | | | पूर्व : | उर्वरित ग. नं. ४५१ पै. |
| | | | | | | दक्षिण : | उर्वरित ग. नं. ४५२ पै. |
| | | | | | | पश्चिम : | नाशिक रस्ता |

## अनुसूची - दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नाव :** मौजे मोशी, जिल्हा पुणे येथील विकास योजनेतील ६०.०० मीटर रुंदीच्या रस्त्याबाबत प्रवेश आणि बाहेर (Entry and Exit) करिता रस्ता रुंदीकरणासाठी भूसंपादन करणेबाबत.

**प्रकल्पाच्या कामाचे वर्णन :** ६०.०० मीटर रुंदीच्या रस्त्याबाबत प्रवेश आणि बाहेर (Entry and Exit) करिता रस्ता रुंदीकरण.

**समाजाला होणारा लाभ :** सुलभ व जलद वाहतूक दळणवळण

**प्रकल्पाखालील जागेची सद्यस्थिती :** जमिनीचे भूसंपादन करावयाचे असून, संपादनाखालील काही क्षेत्र खुले आहे. भूसंपादनाखालील जागेचा ताबा जमीन मालकाकडे आहे.

## अनुसूची - तीन

### पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

### जिल्हा पुणे, तालुका हवेली, मौजे मोशी

| सर्व्हे नंबर / नगर भूमापन क्रमांक | अंदाजित क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|
| लागू नाही | |

## अनुसूची - चार

### ( पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश )

**लागू नाही.**

**टीप :--** उक्त अनुसूचित नमूद जमिनींचे नकाशे भूमी संपादन विशेष अधिकारी, विशेष घटक क्रमांक १, पिंपरी, पुणे-४११०१८, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, संत तुकारामनगर, श्री शिवछत्रपती शिवाजी महाराज, गोल मंडई इमारत, दुसरा मजला, पिंपरी, पुणे-४११०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहण्याकरिता उपलब्ध आहेत.

**जितेंद्र डुडी,**
जिल्हाधिकारी, पुणे.

पुणे, २८ ऑगस्ट २०२६.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.